413/०५

संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
22 MAR 2012
प्राप्त झाले सही.........

**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**

**दिनांक ०३/०३/२०१२**

## महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा नियम, २०१२.

## अधिसूचना

**भारताचे संविधान**

क्रमांक : परीक्षा-२००८ / प्र.क्र.९५ (भाग दोन)/कोषा (प्रशा-३) - भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत येणा-या लेखा व कोषागारे गट-क व स्थानिक निधी लेखा गट-क सेवेत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षेसाठी विनियमन करणारे पुढील नियम तयार करीत आहेत :-

१. या नियमांना, "महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क (सेवा विभागीय परीक्षा) नियम, २०१२" असे म्हणावे.

२. या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ख) "संचालक" याचा अर्थ , संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई, असा आहे ;

(ग) "परिशिष्ट" याचा अर्थ, या नियमांना जोडलेले परिशिष्ट, असा आहे ;

(घ) "परीक्षा" याचा अर्थ, या नियमांतर्गत विहित केलेली विभागीय परीक्षा, असा आहे ;

(ङ) "विद्यमान नियम" याचा अर्थ, या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी लिपिक-नि-टंकलेखक किंवा रोखपाल किंवा निम्नस्तर लिपिक किंवा कनिष्ठ लिपिकांच्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षेसाठी अंमलात असलेले नियम आणि वरिष्ठ लिपिक किंवा टिप्पणी सहायक किंवा संग्रह पडताळक किंवा

रोखपाल व उच्चस्तर लिपिक किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक किंवा जिल्हा ग्राम पंचायत दुय्यम लेखापरीक्षक यांच्याकरिता महाराष्ट्र लेखा लिपिक परीक्षेसाठी अंमलात असलेले नियम असा आहे ;

(च) "गट-क सेवेतील कर्मचारी" याचा अर्थ, लेखा व कोषागारे गट-क सेवा प्रवेश नियम, २००८ नुसार लेखा लिपिक, कनिष्ठ लेखापाल व वरिष्ठ लेखापाल या पदावर आणि स्थानिक निधी लेखा गट-क सेवा प्रवेश नियम, २००८ नुसार लेखापरीक्षा लिपिक, कनिष्ठ लेखापरीक्षक व वरिष्ठ लेखापरीक्षक या पदावर नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(छ) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा असा असून त्यामध्ये शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो :

३. **परीक्षेसाठी पात्रता**

(क) लेखा व कोषागारे गट-क सेवेतील लेखा लिपिक व कनिष्ठ लेखापाल आणि स्थानिक निधी लेखा गट-क सेवेतील लेखापरीक्षा लिपिक व कनिष्ठ लेखापरीक्षक या संवर्गामध्ये नियुक्त झालेला कर्मचारी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा नियुक्त झालेला गट-क सेवा विभागीय परीक्षेस बसण्यास पात्र असेल; किंवा

(ख) पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नियुक्त झालेला लेखा व कोषागारे गट-क सेवेतील लेखा लिपिक आणि स्थानिक निधी लेखा गट-क सेवेतील लेखापरीक्षा लिपिक हा, या परीक्षेच्या भाग-एक ला बसण्यास पात्र असेल; किंवा

(ग) नामनिर्देशनाने नियुक्त झालेला लेखा व कोषागारे गट-क सेवेतील कनिष्ठ लेखापाल आणि स्थानिक निधी लेखा गट-क सेवेतील कनिष्ठ लेखापरीक्षक हा परीक्षेच्या भाग-एक व भाग-दोन ला बसण्यास पात्र असेल ; किंवा

(घ) पदोन्नतीने नियुक्त झालेला लेखा व कोषागारे गट-क सेवेतील कनिष्ठ लेखापाल आणि स्थानिक निधी लेखा गट-क सेवेतील कनिष्ठ लेखापरीक्षक हा परीक्षेच्या भाग-दोन ला बसण्यास पात्र असेल; किंवा

(ङ) जे लेखा लिपिक व लेखापरीक्षा लिपिक, परीक्षेचा भाग-एक उत्तीर्ण झाले असतील व ज्यांनी त्या पदावर दोन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल ते लेखा लिपीक व लेखापरीक्षा लिपीक परीक्षेच्या भाग-दोन ला बसण्यास पात्र असतील; किंवा

(च) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झालेले इतर विभागातील शासकीय कर्मचारी, वैकल्पिक तत्त्वावर सदर परीक्षेच्या भाग-दोन ला बसू शकतील. तथापि, सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे, ते लेखा व कोषागारे गट-क सेवा किंवा स्थानिक निधी लेखा गट-क सेवा यांच्या संदर्भात सेवाप्रवेश किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र असणार नाहीत.

४. **<u>परीक्षेचा अभ्यासक्रम : -</u>**

(क) सदर परीक्षेचा अभ्यासक्रम हा नियमांसोबतच्या 'परिशिष्टामध्ये' दिल्याप्रमाणे असेल. ही परीक्षा, परिशिष्टातील प्रत्येक विषयासमोर नमूद केल्याप्रमाणे पुस्तकांसह किंवा पुस्तकांशिवाय घेण्यात येईल . परीक्षा परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे भाग-एक व भाग-दोन मध्ये घेण्यात येईल.

(ख) परीक्षेचा अभ्यासक्रम व गुण हे 'परिशिष्टात' दर्शविल्याप्रमाणे किंवा शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे असतील.

५. **<u>परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी कालावधी व संधीची संख्या -</u>**

(एक) कनिष्ठ लेखापालाच्या व कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या पदावर नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कनिष्ठ लेखापालास किंवा कनिष्ठ लेखापरीक्षकास, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अनुक्रमे प्रत्येक भागासाठी सलग तीन संधीच्या कालावधीत परीक्षेचा भाग-एक व भाग-दोन उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या कनिष्ठ लेखापाल व कनिष्ठ

लेखापरीक्षक यांना, परीक्षेचा प्रत्येक भाग स्वतंत्रपणे किंवा परीक्षेचे दोन्ही भाग एकाच वेळी घेऊन परीक्षेला बसता येऊ शकेल;

(दोन) लेखा लिपिक आणि लेखापरीक्षा लिपिक पदावर नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या लेखा लिपिकास आणि लेखापरीक्षा लिपिकास अनुक्रमे तीन सलग संधींमध्ये परीक्षेचा भाग-एक उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. कर्मचा-याला, त्यानंतरही परीक्षा देण्याची संधी देण्यात येईल;

(तीन) तथापि, वर (एक) व (दोन) मध्ये नमुद केल्यानुसार विहित कालावधीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास नियम ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल;

(चार) नियम ३ च्या पोट-नियम (ङ) मध्ये तरतुद केल्यानुसार परीक्षेच्या भाग-दोन ला बसण्यास पात्र ठरल्यानंतर, लेखा लिपिक किंवा लेखा परीक्षा लिपिक यांना, वैकल्पिक तत्वावर परीक्षेचा भाग-दोन उत्तीर्ण होण्यासाठी कमाल सहा संधी अनुज्ञेय असतील ;

(पाच) वैकल्पिक तत्वावर परीक्षेस बसणाऱ्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांना, प्रत्येक भागासाठी कमाल सहा संधी अनुज्ञेय असतील;

(सहा) जर अनिवार्य आणि वैकल्पिक तत्वावर परीक्षेस बसणारे उमेदवार परीक्षेस अनुपस्थित राहिले तर त्याच्या/तिच्या संधीची गणना करण्यात येईल.

६. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम -**

ज्यांच्यासाठी परीक्षा अनिवार्य आहे असा कनिष्ठ लेखापाल किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक आणि लेखा लिपिक किंवा लेखापरीक्षा लिपिक हा, नियम ५ मध्ये विहित केलेल्या कालमर्यादेत आणि संधींमध्ये परीक्षेत उत्तीर्ण झाला नाही तर पुढील परिणाम होतील ;-

(एक) उमेदवार परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा विहीत केलेली परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम ७ च्या पोट-नियम (क) अन्वये त्यास सूट मिळेपर्यंत, त्याला कनिष्ठ लेखापाल किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक किंवा लेखा लिपिक किंवा यथास्थिती, लेखापरीक्षा लिपिक या पदावर कायम करण्यात येणार नाही. त्याला, वेतनश्रेणीतील त्याची पुढील वेतनवाढ दिली जाणार नाही. अशा

तऱ्हेने रोखून ठेवलेल्या वेतनवाढी या परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर जेव्हा अशी परीक्षा संपेल त्या दिनांकाच्या दुसऱ्या दिवसापासून किंवा जर परीक्षेचा कालावधी एका दिवसापेक्षा जास्त दिवस असेल तर परीक्षेच्या शेवटच्या दिवसानंतर येणाऱ्या पुढच्या दिवसापासून किंवा ज्या दिनांकास त्याला नियम ७ च्या पोट नियम (क) मध्ये विहित केल्याप्रमाणे परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट मिळाली असेल त्या दिनांकापासून देय होतील आणि पुढील सर्व वेतनवाढी जणू काही, वेतनवाढ रोखण्यात आली नव्हती, असे समजून देय असतील. मागील कालावधीतील थकबाकी त्याला अनुज्ञेय नसेल.

(दोन) त्याला कनिष्ठ लेखापाल किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक किंवा लेखा लिपिक किंवा लेखापरीक्षा लिपिक संवर्गातील ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कनिष्ठ लेखापाल किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक किंवा लेखा लिपिक किंवा यथास्थिती लेखापरीक्षा लिपिक त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व कनिष्ठ लेखापाल किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक किंवा लेखा लिपिक किंवा यथास्थिती लेखापरीक्षा लिपिकाखाली त्याचा ज्येष्ठताक्रम लागेल. जे नियम ५ मध्ये विहित केलेल्या कालावधीत व संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व कनिष्ठ लेखापाल किंवा कनिष्ठ लेखापरीक्षक किंवा लेखा लिपिक किंवा लेखापरीक्षा लिपिक यांच्या खालचा ज्येष्ठताक्रम त्याला देण्यात येईल.

(तीन) लेखा लिपिक व लेखापरीक्षा लिपिक यांना या परीक्षेचा भाग-दोन वैकल्पिक असला तरी, एकदा का त्यांना कनिष्ठ लेखापाल व कनिष्ठ लेखापरीक्षक यापदावर पदोन्नती दिली असेल तर या नियमांच्या नियम ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित केलेल्या कालावधीमध्ये त्यांना या परीक्षेचा भाग दोन उत्तीर्ण व्हावा लागेल अन्यथा त्यांना नियम ६(एक) व (दोन) मधील परिणामांना सामोरे जावे लागेल.

७. <u>परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट</u> :

(क) हे नियम अंमलात आल्याच्या दिनांकानंतर, लेखा लिपिक आणि लेखापरीक्षा लिपिक यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यावर परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट देण्यात येईल ; किंवा

(ख) नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कनिष्ठ लेखापाल व कनिष्ठ लेखापरीक्षकास वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यावर परीक्षेचे भाग-एक आणि भाग-दोन उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल; परंतु अशी सूट मिळाल्याने नियम ६ खंड(ब) च्या तरतुदीनसार त्याने गमावलेली सेवा ज्येष्ठता त्याला पुन्हा मिळणार नाही.

८. **परीक्षा केव्हा व कोठे घेण्यात येईल ;**

(क) संचालक, लेखा व कोषागारे हे, सर्वसाधारणपणे वर्षातून किमान एकदा एकतर एप्रिल/मे किंवा ऑक्टोबर/नोव्हेंबर या महिन्यांमध्ये परीक्षा घेतील. तसेच परीक्षेचा कार्यक्रम किंवा वेळापत्रक ठरवून संबंधित कार्यालयांना कळविण्यात येईल. संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (website) ही माहिती प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षेचा निकाल घोषित करून उक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

(ख) ही परीक्षा, शक्यतो सर्व महसूल विभागांच्या मुख्यालयात घेण्यात येईल.

९. **परीक्षा घेण्यात न आल्यास होणारे परिणाम :**

जर कोणत्याही कारणावरून, कोणतीही परीक्षा घेण्यात आली नाही तर, या नियमातील नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची गणना करताना ही संधी वगळण्यात येईल.

१०. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक :**

दोन्ही भागाच्या म्हणजेच (भाग एक व भाग दोन) प्रत्येक पेपरमध्ये एकूण गुणांच्या ४० टक्के गुण हे परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे मानक असेल. जर उमेदवार कोणत्याही एका पेपरमध्ये जरी उत्तीर्ण झाला तर, त्याला त्या पेपरमध्ये कायमची सूट देण्यात येईल.

११. **विशेष गुणवत्ता :**

पहिल्या प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण होणारा आणि एका किंवा अनेक विषयांमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविणारा उमेदवार हा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल आणि अशा विशेष प्राविण्याची नोंद त्याच्या गोपनीय अहवालात व सेवापुस्तकात घेण्यात येईल.

१२. **प्रशिक्षणासंबंधी :**

लेखा व कोषागारे गट क सेवेतील आणि स्थानिक निधी लेखा गट क सेवेतील ज्यांना सदर परीक्षा अनिवार्य आहे अशा कर्मचाऱ्यांकरिता परीक्षेच्या तयारीसाठी, लेखा व कोषागारे संचालनालय प्रशिक्षणाचे आयोजन करील. परीक्षेच्या तयारीसाठी अशा प्रशिक्षण वर्गाचा लाभ कर्मचाऱ्यास एकदाच घेता येऊ शकेल.

१३. **या नियमांच्या प्रारंभापूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट :**

लेखा व कोषागारे संचालनालयात लिपीक-नि-टंकलेखक किंवा निम्नस्तर लिपीक किंवा वरिष्ठ लिपिक किंवा टिप्पणी सहायक किंवा संग्रह पडताळक किंवा उच्चस्तर लिपिक व त्याच्याशी समतुल्य वेतनश्रेणीच्या पदांवर आणि स्थानिक निधी लेखा विभागांतर्गत लिपिक-नि-टंकलेखक किंवा उच्चस्तर लिपिक किंवा कनिष्ठ लिपीक किंवा ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक व त्याच्याशी समतुल्य वेतनश्रेणीच्या पदांवर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पुढील बाबतीत परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट देण्यात येईल, जेव्हा

एक) त्यास यापूर्वीच तत्सम पदावर कायम करण्यात आले असेल किंवा;

दोन) तो विद्यमान नियमांनुसार यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल किंवा;

तीन) त्यास विद्यमान नियमांनुसार परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून यापूर्वीच सूट देण्यात आली असेल

१४. **या नियमांच्या प्रारंभापूर्वी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांकरीता कालावधी व संधीची संख्या -**

१. ज्या कर्मचाऱ्यांना या नियमांच्या प्रारंभापूर्वी सेवाप्रवेशोत्तर (लिपिकवर्गीय) परीक्षा व महाराष्ट्र लेखा लिपिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते परंतु, ते कर्मचारी परीक्षा उत्तीर्ण झालेले नसतील तर, त्यांना

त्या नियमांमध्ये नमुद केलेल्या कालावधीत ह्या परीक्षांचे अनुक्रमे भाग एक व भाग दोन उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा उमेदवारांना नियमांत अंतर्भूत असलेल्या परिणामांना सामोरे जावे लागेल.

२. जर एखादा उमेदवार वरील उपनियम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्या उमेदवाराला या नियमांच्या अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्यानुसार सर्व विषय घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स. ह. भोसले,
अवरसचिव, वित्त विभाग

**प्रत :**

राज्यपाल यांचे सचिव.
शासनाचे मुख्य सचिव.
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.
~~मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.~~
राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे
सर्व कोषागार अधिकारी
संचालक, भाषा संचालनालय, मुंबई (५ प्रती)
कार्यासन अधिकारी, ब शाखा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कोषा.प्रशा.३).

# परिशिष्ट-एक
## भाग -एक

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | विहित केलेली पुस्तके | |
|---|---|---|---|
| १ | सामान्य विषय<br>कार्यालय रचना, कार्यालयीन कार्यपध्दती, मसुदा लेखन व टिप्पणी (पुस्तकाशिवाय)<br>१०० गुण | लिपिक वर्गीय कर्मचा-यांच्या प्रशिक्षणासाठीची निदेश पुस्तिका (लिपीक वर्गीय)<br>भाग एक, दोन ,दोन-(क),तीन आणि तीन(क) | |
| २ | सामान्य विषय<br>सर्वसाधारण प्रयुक्ती नियम व नियमपुस्तिकांचे (पुस्तकाशिवाय)<br><br>१०० गुण | लिपिकवर्गीय कर्मचा-यांच्या प्रशिक्षणासाठीची निुदेश पुस्तिका (लिपिकवर्गीय)<br>**भाग चार** | |
| | | १ | सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी |
| | | २ | आकस्मिक खर्च |
| | | ३ | अर्थसंकल्प |
| | | ४ | विभागीय आणि भाषा परीक्षा |
| | | ५ | शासन सेवेत सेवाप्रवेश |
| | | ६ | महाराष्ट्र नागरी सेवा नियम परिचय<br>उपविभाग एक : पदे आणि नियुक्ती<br>दोन : वेतन<br>**तीन** : पदग्रहण अवधी<br>**चार** : भत्ते<br>पाच : रजा<br>**सहा** : निवृत्तिवेतन<br>**सात** : संकीर्ण |

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | विहित केलेली पुस्तके | |
|---|---|---|---|
| | | ७ | मुद्रण व लेखनसामग्री |
| | | ८ | शासकीय रक्कम हाताळणे |
| | | ९ | निरीक्षण अहवाल, लेखापरीक्षा आक्षेप इत्यादीच्या जलद निपटा-यासाठी सूचनांची निदेश पुस्तिका |
| ३(क) | **विशेष विषय (पुस्तकांसह)** [लेखा व कोषागारे संचालनालय आणि त्यांचे अधिनस्त दुय्यम कार्यालये यांच्यासाठी]<br><br>१०० गुण | १ | भांडार पडताळणी कर्मचा-यांसाठी अनुदेश नियम पुस्तिका |
| | | २ | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ भाग दोन उपविभाग चोवीस आणि पस्तीस |
| | | ३ | महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड एक भाग एक (विभाग एक आणि तीन) भाग दोन (उपविभाग एक )<br>महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड दोन परिशिष्ट चार |
| | | ४ | मुंबई वित्तीय नियम, १९५९<br>प्रकरण एक व दोन<br>परिशिष्ट २० आणि २२ |
| | | ५ | मुंबई अर्थसंकल्प नियमपुस्तिका<br>प्रकरण नऊ (परिच्छेद १०९) |
| ३(ख) | विशेष विषय (पुस्तकांसह)<br>(अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई कार्यालयासाठी)<br>१०० गुण | १ | अधिदान व लेखा कार्यालय नियमपुस्तिका मुंबई, प्रकरण दोन, **तीन**, चार, पाच, सह, बारा व पंधरा |
| ३(ग ) | विशेष विषय (पुस्तकांसह)<br>[मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, मुंबई आणि त्यांच्या अधिनस्त दुय्यम कार्यालये यांच्यासाठी.<br>१०० गुण | १ | मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, मुंबई यांच्यासाठी कार्यालय नियमपुस्तिका<br>प्रकरण एक ते आठ आणि **बावीस** |
| | | २ | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ भाग दोन **उपविभाग** एक,तीन,चार,पाच, सह आणि सात) |
| | | ३ | मुंबई वित्तीय नियम १९५९<br>प्रकरण एक व दोन<br>परिशिष्टे २० आणि २२ |

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | अ.क्र. | विहित केलेली पुस्तके |
|---|---|---|---|
| ३(घ) | विशेष विषय (पुस्तकांसह)<br>(जिल्हा कोषागारे व उप कोषागारे कार्यालयांसाठी)<br><br>१०० गुण | १ | महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड एक<br>भाग एक<br>भाग दोन ( नियम ६३ ते ९५ वगळून )<br>भाग तीन<br>भाग पाच (प्रकरण एक)<br>भाग सहा<br><br>महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड दोन |
| | | २ | महाराष्ट्र कोषागार नियमपुस्तिका |
| | | ३ | उपकोषागार नियमपुस्तिका<br>(प्रकरण तीन आणि सहा वगळून) |

परिशिष्ट - दोन

भाग - दोन

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | | विहित केलेली पुस्तके |
|---|---|---|---|
| १ | सेवा नियम<br>(पुस्तकांशिवाय)<br><br>१०० गुण | १ | महाराष्ट्र नागरी सेवा नियम<br>पदे आणि नियुक्ती,<br>वेतन,<br>पदग्रहण अवधी,<br>भत्ते,<br>रजा,<br>सेवा निवृत्ती वेतन,<br>संकीर्ण<br><br>मुंबई नागरी सेवा (प्रवास भत्ता) नियम |
| | | २ | मुंबई सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम. |
| २ | लेखा नियम व कोषागार नियम<br>(पुस्तकांशिवाय)<br>१०० गुण | १ | लेखा संहिता खंड एक (प्रकरण १ ते ६ परिशिष्टे १ आणि २) |
| | | २ | महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड एक भाग एक,दोन,पाच<br>(प्रकरण एक ते सहा )आणि (भाग नऊ व दहा) |
| ३ | वित्तीय नियम<br>(पुस्तकांशिवाय)<br><br>१०० गुण | १ | मुंबई वित्तीय नियम १९५९<br>प्रकरण एक ते पाच<br>प्रकरण सहा (उपविभाग एक वगळून)<br>प्रकरण दहा ते बारा<br>प्रकरण पंधरा |
| | | २ | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९५९ |
| | | ३ | निरीक्षण अहवाल आणि लेखापरीक्षा आक्षेप इत्यादींच्या जलद निपटा-यासाठी निदेश पुस्तिका |
| ४ | संक्षेपण व मसुदा लेखन<br>(पुस्तकांशिवाय)<br><br>१०० गुण | १ | दिलेल्या प्रकरणाचा सारांश लिहिणे |
| | | २ | पत्राचा मसुदा तयार करणे |
| | | ३ | शब्दांचा उपयोग करणे आणि वाक्यांची दुरुस्ती करणे |

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | विहित केलेली पुस्तके | |
|---|---|---|---|
| ५ (क) | विशेष विषय प्रात्यक्षिक<br>(कोषागारे)<br>(पुस्तकांसह)<br><br>१०० गुण | १ | शासकीय प्रतिभूती नियमपुस्तिका<br>प्रकरण एक<br>प्रकरण दोन (परिच्छेद ३ वगळून)<br>प्रकरण तीन<br>प्रकरण चार<br>प्रकरण पाच (परिच्छेद ३ वगळून)<br>प्रकरण सहा |
| | | २ | मुंबई मुद्रांक नियमपुस्तिका (तिसरी आवृत्ती)<br>भाग तीन प्रकरण एक आणि दोन, पृष्ठे २६३ ते ३३१ |
| | | ३ | लेखा संहिता खंड - दोन |
| | | ४ | उपकोषागार नियमपुस्तिका |
| | | ५ | महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड एक व दोन<br>भाग दोन<br>भाग चार<br>भाग पाच<br>भाग सहा<br>भाग आठ<br>भाग चौदा (प्रकरण एक. दोन आणि पाच)<br>परिशिष्टे तीन, चार, पाच,सात, दहा, अकरा आणि बारा |

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | | विहित केलेली पुस्तके |
|---|---|---|---|
| ५ (ख) | विशेष विषय (स्थानिक निधी लेखा) (पुस्तकांसह) १०० गुण | | (क) लेखा परिक्षा कार्यपध्दती |
| | | १ | भारत सरकार यांचे लेखा आणि लेखापरीक्षा परिचय (तिसरी आवृत्ती ) - भाग तीन फक्त |
| | | २ | मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालयासाठी नियमपुस्तिका (प्रकरण आठ, नऊ, अकरा, बारा आणि बावीस आणि परिशिष्ट के) |
| | | | (ख) अधिनियम आणि नियम |
| | | १ | मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० आणि खालील नियम |
| | | २ | महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (नोव्हेंबर १९६६ पासून) |
| | | ३ | मुंबई नगरपालिका लेखा संहिता किंवा मध्य प्रांत व व-हाड (सी.पी.आणि बेरार) नगरपालिका अधिनियम याच्या कलमान्वये तयार करण्यात आलेले लेखा नियम |
| | | ४ | क) महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१<br>ख) महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहितेअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम |
| | | ५ | एक) महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा व लेखा) नियम, १९६१<br>दोन) मुंबई ग्रामपंचायत (अर्थसंकल्प लेखा) नियम, १९६१<br>तीन) मुंबई ग्रामपंचायत (ग्राम सुरक्षा निधी नियम, १९५०)<br>चार) मुंबई ग्रामपंचायत (परतावा नियम)<br>पाच) मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम, १९६०<br>सहा) महाराष्ट्र ग्रामपंचायत (रक्कम वसुली )नियम, १९६०<br>सात) महाराष्ट्र ग्रामपंचायत (कर आणि शुल्क)नियम, १९६०<br>आठ) महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्यांनी कराऐवजी ठोक रक्कम देण्यासंबंधी नियम, १९६१)<br>नऊ) महाराष्ट्र ग्रामपंचायत (कर्मचारी) भविष्य निर्वाह निधी नियम, १९६१ |

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | विहित केलेली पुस्तके | |
|---|---|---|---|
| ५ (ग) | विशेष विषय<br>(अधिदान व लेखा कार्यालयासाठी<br>(पुस्तकासह)<br>१०० गुण | १ | अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई नियमपुस्तिका |
| | | २ | भारत सरकार यांचे लेखे आणि लेखापरीक्षा परिचय<br>(तिसरी आवृत्ती ) - भाग तीन फक्त |
| | | ३ | लेखा संहिता खंड चार (प्रकरण १,३,४ आणि १९) |
| | | ४ | महाराष्ट्र कोषागार नियम १९६८<br>{ भाग एक, पाच (प्रकरण एक ते सहा) सहा, नऊ, दहा} |
| | | ५ | वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९६४<br>(वित्तीय प्रकाशन क्रमांक आठ ) |
| ५ (घ) | विशेष विषय<br>[संचालनालय व प्रादेशिक कार्यालये] (पुस्तकासह)<br>१०० गुण | १ | संचालनालय, कार्यालयीन नियमपुस्तिका |
| | | २ | मुंबई अर्थसंकल्प नियमावली (२ री आवृत्ती)<br>वित्तीय प्रकाशन क्रमांक दहा (प्रकरणे चार, पाच, नऊ परिच्छेद ११२ ते ११७, प्रकरण तेरा आणि परिशिष्टे २,४,७,११ आणि १२ वगळून ) |
| | | ३ | एक) मुंबई नागरी सेवा वर्तणूक, शिस्त व अपील नियम<br>दोन) मुंबई नागरी सेवा वर्गीकरण आणि सेवाप्रवेश नियम |
| | | ४ | एक) भांडार पडताळणी कर्मचा-यांसाठी अनुदेशपुस्तिका<br>दोन) मुंबई वित्तीय नियम, १९५९<br>(प्रकरण दोन, विभाग बारा, प्रकरण तेरा,<br>नियम १४६ (अ) आणि (ब)<br>तीन) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५<br>उपविभाग २४ नियम ९४ ते १०३<br>उपविभाग ३४ नियम १६९ ते १८६ |
| ५ (ङ) | विशेष विषय<br>(जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कार्यालयातील, लिपिक कर्मचा-यांसाठी)<br>(पुस्तकासह)<br>१०० गुण | १ | केंद्रीय सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता<br>(खाली नमूद केलेली प्रकरणे)<br>प्रकरणे दोन, तीन, पाच, सहा, सात, आठ, दहा<br>(परिच्छेद १९७ ते २०४ आणि २०६,२०७,२२८ ते २३२, २३४ ते २८६, २८८ ते ३१२)<br>अकरा, तेरा (परिच्छेद ३४३ ते ३६१ आणि ३७१ ते ३७४)<br>पंधरा, बावीस आणि तेवीस (परिच्छेद ५४३ ते ५४५ आणि ५५०) |
| | | २ | मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका<br>(खालील नमूद केलेली प्रकरणे)<br>प्रकरण दोन (परिच्छेद ७२,८८ ते ९७ आणि १०८)<br>तीन (परिच्छेद १२७ ते १३४, १४३ ते २१६, २३० ते २५५ आणि २८० ते २९१) ... पुढील पानावर |

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | | विहित केलेली पुस्तके |
|---|---|---|---|
| ५ (ङ) | पुढे चालू | | ... मागील पानावरुन पुढे चालू<br>पाच (परिच्छेद ३१९, ३२६, ३७८ आणि ३८२)<br>सात (परिच्छेद ४०८ ते ४१९, ४४० ते ४४५, ४५४ ते ४५८ आणि ४६१ ते ४७५) आणि आठ |
| | | ३ | जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता |
| | | ४ | महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ (प्रकरणे सहा आणि नऊ ते बारा ) |
| | | ५ | जिल्हा परिषदेच्या बाबतीत (अर्थोपाय) स्थिती आणि अर्थसंकल्प कार्यपध्दतीच्या अनुषंगाने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित झालेले स्थायी आदेश |
| ५ (च ) | विशेष विषय<br>(महाराष्ट्र शासनाचे वित्तीय सल्लागार आणि उपसचिव, यांच्यासाठी<br>(पुस्तकांसह)<br>१०० गुण | १ | अन्न लेखा नियमपुस्तिका<br>उपविभाग एक ते सहा |
| | | २ | अन्न लेखा नियमावली मध्ये विहित केलेल्या लेखांकन कार्यपध्दतीबाबत निदेशपुस्तिका (प्रकरण १,२,३ आणि ५) |
| | | ३ | भांडारपाल आणि भांडार व्यवस्थापक यांच्यासाठी अनुदेश नियमपुस्तिका<br>(प्रकरण १,२,७ आणि ९) |